Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

# पर्यावरणासाठी शिक्षण

**डॉ. सूर्यभान वाजे,**
**प्राचार्य,**
**अॅड. व्ही.एच. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक-2**

**प्रास्ताविक -**

पृथ्वीवरील मानवाच्या सुरुवातीच्या उत्क्रांतीच्या टप्प्यात त्याच्या गरजा अत्यंत कमी होत्या, तो तत्कालीन इतर पशूसारखाच राहत होता. त्यामुळे त्यांच्या कृती पर्यावरणाला बाधक नव्हत्या. मानवी लोकवस्त्या व कृषि / शेती करणे यासाठी लाखो वर्षे / काही कोटी वर्षे लागली. त्यानंतर मानवाने वेगाने प्रगती केली. मानवी जीवन सुखी करण्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञानात प्रगती केली. नैसर्गिक साधनसामग्रीचा व स्त्रोतांचा वापर करुन सांस्कृतिक पर्यावरणात प्रचंड वाढ केली. परिणामत: लाकूड, खनिजपदार्थ, दगडी कोळसा, पेट्रोल इत्यादी इंधने हवेतील घटकांचे खतनिर्मितीसाठी शोषण या कृतीमुळे सर्वच स्तरावरील जल, भू-वायू, परिसर, घर यातील प्रदूषणाचे प्रमाण प्रचंड मोठया प्रमाणात वाढले. आता हे प्रदूषण मानवाच्या हाताबाहेर गेल्यामुळे व त्याची झळ मानवास बसत असल्यामुळे पुढे चालून मानवी लोकसंख्येवर नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती ओढवू शकते याची जाणीव मानवाला झाली आहे. हे प्रदूषण कसे थांबविता येईल त्यातूनच पर्यावरण शिक्षणाची संकल्पना निर्माण झाली आहे.

ज्ञान, आकलन, कौशल्य, जागृती आणि प्रत्यक्ष अनुभव घेऊन आपली सकारात्मक मनोभूमिका निर्मितीसाठीचे शिक्षण म्हणजे पर्यावरण शिक्षण होय. ज्यात शहरी आणि ग्रामीण लोकांना विज्ञान व तंत्रज्ञानाचा उपयोग शुध्द व स्वच्छ प्रदूषणरहीत जल, वायू, अन्न यांची उपलब्धता कशी होईल यासाठीचे उपक्रम, नियोजन आणि व्यवस्थापन यांचे कौशल्य शिक्षणातून संपादित व्हावेत. अध्ययनकर्त्याला पर्यावरणीय समस्या निर्माण होण्याची कारणे व त्या समस्यांतून निर्माण होणारी लक्षणे यांचा शोध होऊन त्याचे निराकरण करता यावे.

पर्यावरण शिक्षण ही एक सातत्यपूर्ण जीवनभर चालणारी प्रक्रिया आहे. या शिक्षणाची सुरुवात शालापूर्व स्तरावरुन प्राथमिक माध्यमिक विदयालयीन अशा औपचारीक शिक्षणक्रमाबरोबरच अनौपचारिक शिक्षणातून मासिके, टी.व्ही., प्रत्यक्ष सहल यातून होते. तसेच हे शिक्षण आंतरविदयाशाखीय आहे. त्यामुळे एकसंघ आणि संतुलित दृष्टीकोन निर्माण होतो.

**पर्यावरण शिक्षण - व्याख्या -**

अनेक तज्ज्ञांनी पर्यावरणाच्या केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

" विविध परिसंस्था प्रणालीचे परस्पर संबंधातील संतुलन मूलक तत्वांचा शास्त्रीय अभ्यास म्हणजे पर्यावरणशास्त्र होय."  **बर्नाड नेबेल**

" कोणत्याही बाहय शक्तीचा होणारा परिणाम म्हणजे पर्यावरण होय."  **डॉ. रॉस**

" सजीवांचा विकास व पूर्नउत्पादन यावर प्राकृतिक व सजीव घटकांच्या होणा-या संयुक्त परिणामास पर्यावरण असे म्हणतात. "  **मॅक नॉ घटन आणि उल्खप**

" पृथ्वीवरील सर्व घटकांचे आकलन, त्याचा मानवी जीवनावर होणा-या परिणामांचा अभ्यास म्हणजे पर्यावरण शास्त्र होय."  **जॉन टर्क**

" Environmental Education means the education process dealing with mans relationship with his natural and man made surroundings and includes the reaction of population, pollution resource allocation and depletion, conservation transportation, Technology and urban rural planning to the total human environment."


" Environment Education may also be defined as a process for developing skills and attitudes necessary to understand and appreciate the inter relationship between man, his nature and his biophysical surroundings. "

**पर्यावरण शिक्षणाचे संकल्पनात्मक प्रतिमान -**

पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम हा बहुशाखीय व आतंरशाखीय स्वरुपाचा आहे. त्यात अनेक विषयांचे संघटन व संकल्पना, प्रक्रिया, सूत्रे यांचा या विषयाच्या अभ्यासात अंर्तभाव असतो. म्हणून पर्यावरणीय शिक्षणाच्या आंतरशाखीय प्रतिमानात इतर अनुषंगिक विषयाच्या शाखेतील अनेक घटकांचा समावेश केलेला असतो.

बहुशाखीय प्रतिमानात पर्यावरणीय शिक्षणाच्या संकल्पना इतर प्रस्थापित शाखेशी एकसंघ एकजीव करण्यात आल्या आहेत.


**आकृती क्र.1**




Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

**आंतरशाखीय प्रतिमान** **Interdisciplinary Model**

**(आ.क्र.2)**




आंतरशाखीय प्रतिमान (आ.क्र.1): बहुशाखीय प्रतिमान (आ.क्र.2) या दोन्ही प्रतिमानांचा शालेय अभ्यासक्रमात उपयोग करतांना उपयुक्तता आधिक असून काही प्रमाणात मर्यादा पडतात. त्या काही घटकांच्या अमंलबजावणीमुळे, तर शिक्षकातील उपजत कौशल्य आणि क्षमतेचा प्रभाव किंवा अभावामुळे, पाठयक्रमाचा, अभ्यासक्रमाचा, शिक्षणावरील ताण, मूल्यमापन प्रक्रियेतील बदल इत्यादी कारणांमुळे, बहुशाखीय प्रतिमान राबवितांना अडचणी येवू शकतात. परंतु आंतरशाखीय प्रतिमानाचा वापर हा त्यामानाने सुलभ असतो. याचा वापर प्राथमिक स्तरावरील अध्यापनापेक्षा माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रम राबविल्यास व त्याची अंमलबजावणी करण्यास सुलभ असतो. बहुशाखीय प्रतिमानाने पर्यावरण शिक्षण घेतांना त्यातील एकसंघता, शिक्षक आणि आशय यातील सहकार्य व एकजीनसीपणा त्या त्या विषयाची खोली व आवाका शिक्षकांच्या लक्षात व क्षमतेत असतील तर हे प्रतिमान पर्यावरणीय प्रभाव व दर्जा वाढ वाढविण्यास पोषक ठरते.


पर्यावरण शिक्षण :- वर्गीकरण आराखडा
औपचारिक शिक्षण
अनौपचारिक शिक्षण
शालेय शिक्षण
निम्न प्राथमिक
उच्च प्राथमिक
माध्यमिक
उच्च माध्यमिक
शिक्षक प्रशिक्षण सेवापूर्व सेवांतर्गत
तांत्रिक शिक्षण अभियांत्रिकी, वैद्यकिय
स्नातक शिक्षण कला, वाणिज्य व विज्ञान
जनसंपर्क साधने, टी.व्ही, रेडिओ, दैनिक वृत्तपत्रे, मासिके, चर्चासत्रे, परिसंवाद
बातम्या (News)
प्रौढ शिक्षण (Adult Education)

**प्राथमिक स्तरावरील पर्यावरण शिक्षण -**

**उद्दिष्टये -**

1. विदयार्थ्यांना निसर्गाच्या माध्यमातून शिक्षण देणे.
2. विविध प्रकारच्या सजीवांची माहिती देऊन त्यांच्यातील परस्पर संबंधाचे ज्ञान देणे.
3. पर्यावरण संतुलनाबाबत माहिती देणे.
4. नैसर्गिक पर्यावरणाच्या बाबतील विदयार्थ्यात उत्सुकता निर्माण करणे.
5. वैयक्तिक आरोग्याकडे लक्ष देण्यास प्रवृत्त करणे.

**पाठयक्रम -**

वरील उद्दिष्टे पर्यावरण शिक्षणाच्या पाठयक्रमातील पुढील घटकातून साध्य करावीत.

1. निसर्गाचा इतिहास
2. उत्क्रांतीविषयक सामान्य माहिती देणे.
3. सजीवाविषयी सर्वसामान्य माहिती
4. पर्यावरण विषयीचे महत्त्व
5. परिसर ज्ञान

**1. माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील पर्यावरण शिक्षण -**

**उद्दिष्टये -**

1. पर्यावरणाचे मानवी जीवनातील महत्त्व स्पष्ट करणे.
2. परिसंस्थे विषयक ज्ञान देणे.
3. पर्यावरणाविषयी व्यक्ती सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे.
4. पर्यावरणाविषयी व्यक्तिमध्ये सकारात्मक मूल्ये रुजविणे.
5. पर्यावरण, प्रदूषण व त्याचा सजीवावरील परिणाम स्पष्ट करणे.

➢ **पाठयक्रम -**

1. पर्यावरणविषयी सामान्य माहिती
2. परिसंस्था रचना व त्यातील घटकांचा आंतरसंबंध

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

3. पर्यावरण संवर्धनाची मूलतत्वे
4. पर्यावरण, प्रदूषण प्रकार कारके व परिणाम
5. पर्यावरण संवर्धनात नागरिकांची भूमिका
6. नैसर्गिक साधनसंपत्तीचा स्त्रोत
7. पर्यावरणीय समस्या

➢ **उपक्रम - पर्यावरणीय विषयक उपक्रम -**

1. पर्यावरणविषयक चित्रपट, दृकश्राव्य साधने, प्राणीसंग्रहालयास भेट
2. परिसरातील सजीवांचे नमूने संकलित करणे.
3. परिसरातील मोकळया जागी वृक्षारोपन करणे.

➢ **पर्यावरणादिन साजरे करणे -**

5 जून -जागतिक पर्यावरण दिन, 24 मार्च जागतिक पर्यावरण दिन, 22 एप्रिल - वसुंधरा दिन, 1 ते 7 ऑक्टोबर- वन्यजीव सप्ताह, 19 नोव्हेंबर ते 18 डिसेंबर राष्ट्रीय पर्यावरण जागृती मास

- सहल प्रभात फेऱ्या, पर्यावरण दिंडी,
- पर्यावरणविषयक प्रदर्शन

➢ **प्रबोधन -** सण, उत्सव कसे साजरे करणार ?

- होळी - लाकडे, गोव-या बचाव
- नागपंचमी -सापाला दूध पाजू नका
- दिवाळी- ध्वनी प्रदूषण टाळा.

**पर्यावरण शिक्षण अध्यापन पद्धती -**

पर्यावरण शिक्षणासाठी पुढीलप्रमाणे अध्यापन पद्धतीचा वापर करता येईल. व त्यातून पर्यावरण शिक्षण देता येईल.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

**पर्यावरण अध्यापन**

- निरीक्षण पद्धती (Observation Method)
- प्रकल्प पद्धती (Project Method)
- प्रात्यक्षिक पद्धती (Practical Method)
- सांघिक संप्रेषण पद्धती (Team Teaching Method)
- आशययुक्त अध्यापन पद्धती (Content Cum Methodology)
- समवाय पद्धती (Method of Correction)
- सहकार्य अध्यापन पद्धती (Co-operative Learning Method)
- सहल पद्धती
- चर्चा पद्धती (Discussion Method)

या सर्व पद्धतीने पर्यावरण शिक्षण देता येईल.

**संदर्भ :**

1. **पर्यावरण शिक्षण,** डॉ.डी.आर. कुलकर्णी.
2. **पर्यावरण शिक्षण,** डॉ. हेमलता पारसनीस.
3. **पर्यावरण शिक्षण,** डॉ. जयश्री बहुलीकर.
4. **पर्यावरण शिक्षण,** संस्कार नियतकालिक, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक.